# पुणे महानगरपालिका
# स्थायी समिती
# कार्यपत्रिका क्र. ३०
# सभा क्र.३८, दिनांक ३१/१०/२०२५ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक तहकूब (शुक्रवार, दि. २४/१०/२०२५ रोजीची) सभा शुक्रवार, दि. ३१/१०/२०२५ रोजी सकाळी ११.१५ (अकरा वाजून पंधरा मिनिटे) वाजता मा. महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका भवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| मा. नवल किशोर राम | – | प्रशासक तथा महापालिका आयुक्त, पुणे मनपा |
| मा. श्रीमती पवनीत कौर | – | अति.महा.आयुक्त (ज) |
| मा. ओमप्रकाश दिवटे | – | अति.महा.आयुक्त (वि) |
| मा. पृथ्वीराज बी.पी. | – | अति.महा.आयुक्त (इ) |
| मा. प्रशांत वाघमारे | – | शहर अभियंता |
| मा. सौ.योगिता भोसले–निकम | – | नगरसचिव |
| मा. अनिरूध्द पावसकर | – | मुख्य अभि.(पथ) |
| मा. नंदकुमार जगताप | – | मुख्य अभि.(पा.पु.) |
| मा. डॉ. नीना बोराडे | – | आरोग्य प्रमुख |
| मा. प्रशांत ठोंबरे | – | उपायुक्त |
| मा. माधव जगताप | – | उपायुक्त |
| मा. श्रीमती किशोरी शिंदे | – | उपायुक्त |
| मा. संदीप खलाटे | – | उपायुक्त |
| मा. रवि पवार | – | उपायुक्त |
| मा. संतोष वारूळे | – | उपायुक्त |
| मा. संदीप कदम | – | उपायुक्त, (घनकचरा व्यवस्थापन) |
| मा. अविनाश सकपाळ | – | उपायुक्त, (कर आकारणी व कर संकलन) |
| मा. विजयकुमार थोरात | – | शिक्षणाधिकारी |
| मा. जगदीश खानोरे | – | अभियंता (मलनिःसारण) |
| मा. राहुल जगताप | – | उपायुक्त, (माहिती व तंत्रज्ञान) |
| मा. नितीन केंजळे | – | मुख्य कामगार अधिकारी |
| मा. सौ. वाखारे | – | शिक्षण मंडळ |
| मा. सुहास बनकर | – | अभियंता |
| मा. रवि खंदारे | – | अभियंता |
| मा. इंदाणी | – | अग्निशामक अधिकारी |

**मा. प्रशासक –** सभेला सुरूवात करावी.

**नगरसचिव –** सभेला सुरूवात करण्यात येत आहे.

<u>**कार्यपत्रिकेवरील विषय**</u>

<u>**घनकचरा व्यवस्थापन आढावा**</u>

**विषय क्र.७९२**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी १५ क्षेत्रीय कार्यालयाकडील दि.०१/०९/२०२५ ते दि.३०/०९/२०२५ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणे बाबत मा. उप आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन यांचे जा.क्र.घ.क.व्य.का./४२२३, दि.१४/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

<u>**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**</u>

**विषय क्र.७९३**

उप आयुक्त, परिमंडळ क्र.२ कार्यालयाचे नियंत्रणाखालील औंध बाणेर, शिवाजीनगर-घोलेरोड, व कोथरूड-बावधन क्षेत्रीय कार्यालयांकडील १४ मुद्द्यांबाबतची <u>माहे सप्टेंबर २०२५</u> चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/परि.२/७८१, दि.१५/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.७९४**

उप आयुक्त, परिमंडळ क्र.१ कार्यालयाचे नियंत्रणाखालील ढोले पाटील, येरवडा कळस धानोरी, व नगररोड वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयांकडील १४ मुद्द्यांबाबतची माहे सप्टेंबर २०२५ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/परि.१/७८५, दि.१५/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र.७९५**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.१, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.०१/०९/२०२५ ते दि.३०/०९/२०२५ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.१/७५५, दि.१३/०९/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.७९६**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.२, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.०१/०९/२०२५ ते दि.३०/०९/२०२५ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र मआ/परिमंडळ-२/७८३, दि.१५/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.७९७**

दिनांक २९/०९/२०२५ ते दिनांक ०५/१०/२०२५ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण १६ आगींबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/७७७, दि.१५/१०/२०२५ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.७९८**

दिनांक २२/०९/२०२५ ते दिनांक २८/०९/२०२५ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण २२ आगींबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/७७६, दि.१५/१०/२०२५ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**टेंडर्स न मागविता ५ (२) (२) अन्वये प्रकरणे**

**विषय क्र.७९९**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण ५ मधील कलम २ (२) मधील तरतुदीच्या अनुषंगाने सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात शिक्षण विभाग, पुणे मनपाच्या शाळांतील इयत्ता २ री ते ५ वीच्या विद्यार्थ्यांना लेखन सरावासाठी पूरक पुस्तके/व्यवसाय पुस्तके शिक्षण विभागाकडून अंतिम केलेल्या प्रकाशकांकडून खरेदी करणेस तसेच त्यांचेशी करारनामा करणेस व झालेल्या कामाचे बिल आदा करणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भांडार/७९७, दि.१६/१०/२०२५ चे पत्र.

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण ५ मधील कलम २ (२) मधील तरतुदीच्या अनुषंगाने सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात शिक्षण विभाग, पुणे मनपाच्या शाळांतील इयत्ता २ री ते ५ वी च्या विद्यार्थ्यांना लेखन सरावासाठी पूरक पुस्तके/व्यवसाय पुस्तके मा. महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या यादीतील शिक्षण विभागाकडून अंतिम केलेल्या प्रकाशकांकडून रक्कम रुपये ४,४९,८२,३८०=४ (अक्षरी रक्कम रुपये चार कोटी एकोणपन्नास लक्ष ब्याऐंशी हजार तीनशे ऐंशी पैसे चार मात्र) पर्यंत खरेदी करणेसाठी कौशल्या प्रकाशन, टार्गेट लर्निंग व्हेंचर, टेक निओ पब्लिकेशन यांचे वतीने मे. चिन्मय इंटरप्रायजेस, बूडस्राईप पब्लिशिंग हाउस सैफी, लेझीबोन एज्यु.प्राय. लिमी., नवनीत प्रकाशन यांना कार्यादेश देणेस व त्यानुसार त्यांचेशी करारनामा करणेस तसेच त्यापोटी बिल आदा करणेस

२. सदर कामाचे देयक पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभाग प्राथमिक कार्यालयाकडील बजेट कोड RE12A115C बजेट हेड लेखन साहित्य व पाट्या खरेदी या अर्थशिर्षकामध्ये एकूण रक्कम रुपये ५ कोटी पैकी वित्तीय मान्य रक्कम ४,५०,००,०००/- या अर्थशिर्षकामधील तरतुदीमधून खर्ची करणेस.

मा. प्रशासक – आता अर्धे वर्ष संपले आहे आणि आता कुठे खरेदी करता, आता हा विषय अमान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दफ्तरी दाखल करण्यात येत आहे.**

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र.८००**

पुणे, पेठ बालेवाडी स.नं. ३४ (भाग) व ३५ (भाग) येथील उद्यान (जी-१) आरक्षण क्षेत्रापैकी ताब्यात आलेले क्षेत्र वगळून उर्वरित सुमारे १९६३२.७५ चौ.मी. आरक्षित जागा भूसंपादन कायद्यानुसार ताब्यात घ्यावी लागणार आहे. तरी जागामालक देवी कन्स्ट्रक्शन तर्फे भागीदार श्री. विनोद बाणी यांनी पुणे महानगरपालिकेस महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम कलम १२७ अन्वये बजावलेल्या परचेस नोटीसचे अनुषंगाने पुणे, पेठ बालेवाडी स.नं. ३४ (भाग) व ३५ (भाग) येथील उद्यान (जी-१) आरक्षित सुमारे १९६३२.७५ चौ.मी. जागेकरीता भूसंपादनाची कार्यवाही सुरू करणेस स्थायी समिती मार्फत मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/७५६, दि.१३/१०/२०२५ चे पत्र.

**(टीप:- सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि.१६/१०/२०२५ च्या सभेत ठरले होते.)**

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.८०१**

पुणे महानगरपालिका प्रशासनाकाडील गट-अ मधील संवर्गासाठी निवडश्रेणी वेतानस्तर मंजूर करण्याबाबतची कार्यपध्दती आणि पात्रतेच्या अटीबाबत मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या विषयपत्रात नमूद केलेल्या बाबीस मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/साप्रवि/आस्था ७६४ , दि.१३/१०/२०२५ चे पत्र

**(टीप:- सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि.१६/१०/२०२५ च्या सभेत ठरले होते.)**

मा. थोरात, उपायुक्त (सा.प्र.) – मागच्या वेळी हा विषय परिपूर्ण आला नव्हता.

मा. प्रशासक– परतच्या वेळी विषय आणताना पार्टवाईज करू नका, सगळया पदांचा एकत्रितच विषय आणा.

नगरसचिव – पुढील सभेला घ्यायचा का?

मा. थोरात, उपायुक्त (सा.प्र.) – नाही, आता विषयपत्र मागे घेतो आणि नवीन विषयपत्र सादर करतो.

मा. प्रशासक – ठीक आहे, विषयपत्र मागे घ्या.

**निर्णय– सदरचे विषयपत्र मागे घेण्यात आले.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन सभा समाप्त झाली.

**सही /–** xxx
**(योगिता भोसले)**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**.

**दि. ०७/११/२०२५ रोजी वृत्तांत मंजूर.**

**सही /–** xxx
**(नवल किशोर राम)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**